# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)


## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी सन २०२२-२३ वर्षाकरीता गाईचे शुध्द तूप खरेदीकामी शुध्द तूपाचे उत्पादक/ प्रोसेसिंग करणा-यांकडूनच ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा कालावधी | निविदा फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | मे २०२२ ते जुलै २०२२ | रु.४०,०००/- | रू.४,००,०००/- |
| ०२ | ऑगस्ट २०२२ ते ऑक्टोबर २०२२ | | |
| ०३ | नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३ | | |
| ०४ | फेब्रुवारी २०२३ ते एप्रिल २०२३ | | |

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि.१८/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१०/०५/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. दि.११/०५/२०२२ ते दि.१३/०५/२०२२ या कालावधीत स.१० ते सायं.०५.०० वाजेपर्यंत निविदेमध्ये दर भरलेल्या ब्रॅण्डचा शुध्द तूपाचा १५ किलोचा डबा शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावा.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.१४/०५/२०२२ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109

Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870

(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

---

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from Manufacturers/Processors for the supply of Cow Ghee Pure for our Ladu Nirmiti, Prasadalya & Temple Department for the year 2022-23 as per details given below-

| Sr.No | Tender period | Tender Fee | E.M.D. |
|---|---|---|---|
| 01 | May 2022 to July 2022 | Rs.40,000/- | Rs.4,00,000/- |
| 02 | August 2022 to October 2022 | | |
| 03 | November 2022 to January 2023 | | |
| 04 | February 2023 to April 2023 | | |

1. E-Tender & its terms and conditions are available on **www.mahatenders.gov.in.**
2. The E-Tender is available for Downloading & Uploading from 18/04/2022 11.00 AM to 10 /05 /2022 up to 5 PM.
3. **Tender Fee & EMD should be paid Online on the website www.mahatenders.gov.in**
4. The sample Tin of 15 Kg. Pure Cow Ghee is to be submitted from 11/05/2022 to 13/05/2022 within office hours i.e 10 AM to 5.00 PM at our Shirdi Purchase Office.
5. If possible Technical Bids will be opened on 14/05/2022.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

**(Bhagyashree Banayat, I.A.S,)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.
तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी सन २०२२-२०२३ गाईचे शुध्द तूप चार टप्प्यांमध्ये पुरविणेबाबत ई-निविदा

१. (मे २०२२ ते जुलै २०२२) -तीन महिने
२. (ऑगस्ट २०२२ ते ऑक्टोबर २०२२) - तीन महिने
३. (नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३) - तीन महिने
४. (फेब्रुवारी २०२३ ते एप्रिल २०२३) - तीन महिने

A. **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी सन २०२२-२३ वर्षाकरीता गाईचे शुध्द तूप पुरविणेबाबत ई-निविदा**

B. **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत FSSAI/AGMARK परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षांची **किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. २०,००,००,०००/- (वीस कोटी) असणे अनिवार्य राहील.** तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

६. कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्था/महामंडळ/देवस्थानकडून काळया यादीत समाविष्ट न केलेबाबतचे स्वस्वाक्षरीचे फर्मचे **लेटर हेडवर हमी पत्र** ऑनलाईन सादर करावे.

७. संस्थानला गाईचे शुध्द तूपाचा नियमित पुरवठा करण्यासाठी प्रतिदिन २५ क्विंटल किंवा त्यापेक्षा जास्त उत्पादन क्षमता असली पाहिजे. त्या दाखल क्षमतेचा उल्लेख असलेले FSSAI/AGMARK/ सक्षम शासकीय प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

C. **निविदाधारकाने शुध्द तूपाचा नमुना सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या गाईचे शुध्द तूपाचा ***१५ कि.ग्रॅ वजनाचा सिलबंद डबा*** श्री साईबाबा संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. त्यावर आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. नमुना म्हणून दिलेला डबा कोणत्याही सबबीवर परत केला जाणार नाही अगर बदलता येणार नाही.

२. शुध्द तूपाचा **FSSAI/AGMARK NORMS चे दर्जाचा** ब्रॅण्डचे पॅकिंग असलेला एकच नमुना सादर करावा.

३. निविदाधारकाने शुध्द तूपाचा नमुना देताना FSSAI/AGMARK NORMS चे दर्जाचा व ब्रॅण्डचा असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच दर्जाचे तुपाच्या ब्रॅण्डचा पुरवठा संस्थानला होईल.

D. **पुरवठा करावयाच्या शुध्द तूपाचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. पुरवठा करावयाचे शुध्द तूपाचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. मे २०२२ ते जुलै २०२२, ऑगस्ट-२०२२ ते ऑक्टोंबर २०२२, नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३, फेब्रुवारी २०२३ ते एप्रिल २०२३ अशा प्रत्येक तीन महिन्याचे कालावधीत शुध्द तूप पुरविणेसाठी BOQ चे चार भाग करण्यात आले आहेत. निविदाधारक कुठल्याही १/२/३ किंवा ४ भागासाठी किंवा ४ ही भागांसाठी निविदा सादर करू शकतो. तथापि निविदा फी व बयाणा रक्कम खाली नमूद केलेप्रमाणेच राहिल. निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ऑनलाईन BOQ मध्ये दर भरावे लागतील.

२. प्रत्येक भागाचे कालावधीसाठी BOQ मध्ये भरलेल्या दरांचा तुलनात्मकदृष्टया स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल.

३. प्रत्येक भागामध्ये भरलेले दरांचा विचार करून अंतीम निर्णय घेण्यात आलेनंतर त्यातील दरानुसार त्या-त्या कालावधीतील अगर प्रायोगिक तत्वावर पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे करारनामा व पुरवठा आदेश रकमेच्या ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत भरावी लागेल.

४. निविदा फी रक्कम रु.४०,०००/- व बयाणा रक्कम रु.४,००,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

## E. निविदाधारकांसाठी सुचना-

१. सदर निविदा दि. १५ / ४ /२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. १० / ५ /२०२२ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या शुध्द तूपाचा नमुना ***डबा*** दि. ११ / ५ /२०२२ ते दि. १३/ ५ /२०२२ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावा.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. १७/ ५ /२०२२ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

७. सदर शुध्द तूप पुरविण्याची निविदा फक्त **उत्पादक/प्रोसेसिंग करणारांनीच** भरावी.

८. निविदा कागदपत्रांसमवेत C.A Certificate व हमीपत्र नमुना प्रत सोबत पान.नं ११ ते १२ वर नमूद आहे. सदर प्रमाणपत्र या नमुन्यात ऑनलाईन तांत्रिक निविदेसोबत सादर करावेत.

९. पुर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

## F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST, GST-TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, वाराई, वाहन हॉल्टींग चार्जेस शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे वाहतुक वगैरे खर्च विचारात घेऊनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार आयकर, वस्तु व सेवा कर इ.संबंधित कर विषयक कपाती बीलातून करण्यात येतील. तसेच शासन वेळोवेळी ज्या प्रमाणे करांचे दरात बदल करेल त्यानुसार ते लागू करण्यात येतील. शासनाने एखादा नवीन कर लागू केल्यास नियमानुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

३. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना सर्व समावेशक खर्चासह **प्रती क्विंटलचे** दर भरावेत.

## G. *ऑनलाईन तांत्रिक व कमर्शिअल निविदा उघडण्याची कार्यपध्दती आणि व्हेंडर ऑडिट-*

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ***निविदाधारकांनी सादर केलेल्या शुध्द तुपाचे नमुन्यांचा दर्जा तज्ञांकडून तपासण्यात येईल. तज्ञांनी दर्जा तपासलेनंतर ज्या निविदाधारकांच्या तुपाचा दर्जा चांगला आहे त्यांची यादी तयार केली जाईल. तसेच त्या यादीप्रमाणे तुपाचे नमुन्यांची FSSAI/AGMARL Norms प्रमाणे आहेत कि नाही? याबाबत NABL/राज्य शासन/ केंद्र शासनाच्या लॅब मधून लॅब तपासणी केली जाईल.***

२. तज्ञांचे व लॅब तपासणीत पात्र ठरणारे निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील व त्यातून न्युनतम दर असणारे निविदाधारकांचे दरांचा विचार करण्यात येऊन त्यांचेशी चर्चा वाटाघाटी करून अंतिम निर्णय घेतला जाईल.

३. वरील प्रक्रियेमध्ये न्युनतम असलेल्या दरधारकांचे प्लॅन्टचे व्हेंडर ऑडिट केले जाईल, सदर पुरवठादाराचे संस्थेचे/प्लॅन्टचे व्हेंडर ऑडिटचा सकारात्मक अहवाल प्राप्त झालेनंतर पुरवठा आदेश देणेबाबत विचार करण्यात येईल.

## H. शुध्द तुपाचा पुरवठा करावयाचे ठिकाण-

१. निविदेत नमूद केलेल्या शुध्द तूपाचा पुरवठा शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे मुख्य भांडार विभागामध्ये करावा लागेल.

## I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत शुध्द तूपाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर तूपाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर शुध्द तूपाचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजूर झालेनंतर शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

## J. शुध्द तूपाचा पुरवठा करण्याची मुदत व पुरवठा आदेश देण्याची पध्दत -

१. शुध्द तूपाचा पुरवठा करण्याचा कालावधी मे २०२२ ते जुलै २०२२, ऑगस्ट २०२२ ते ऑक्टोबर २०२२, नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३, फेबुवारी २०२३ ते एप्रिल २०२३ असा राहिल.

२. शुध्द तूप पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर पुरवठा चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात तूपाचा पुरवठा करावा लागेल.

३. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर हि सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात/अगर कमी जास्त मुदतीत अगर श्री साईबाबा संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे तूपाची मागणी केली जाईल. एकदम सर्व तूप घेतले जाणार नाही. श्री साईबाबा संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी तूप पुरवावे लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेले तूप स्विकारले जाणार नाही.

४. चारही टप्प्यांची निविदा एकाच निविदाधारकास मंजूर झाल्यास निविदा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो श्री साईबाबा संस्थानला तूपाची गरज असल्यास आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा तूपाचा पुरवठा मंजूर दराने करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

५. निविदा पुरवठा कालावधीत आदेशात नमूद केलेले गाईचे शुध्द तूपाचा पुरवठा पुर्ण झाला तर सदर आदेशातील नमूद केलेल्या शुध्द तूपाचे परिमाणापेक्षा २५ टक्के जादा तूप मंजूर दरानेच पुरविणे निविदाधारकास पुरविणे बंधनकारक राहील.

६. निविदा पुरवठा कालावधीत पुरवठा आदेशाइतक्या तुपाचा पुरवठा पुर्ण झाला नाही तर उर्वरीत तुपाचा पुरवठा व पुरवठा आदेशाच्या २५ टक्के तुपाचा पुरवठा करारनामा कालावधीत अगर पुढील तिमाही अगर पुढील वर्षाची निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत (यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेपर्यंत) मान्य दराने पुरवठाधारकास करावा लागेल.

७. एकच निविदाधारक निविदेत नमूद चारही तिमाही कालावधीसाठी न्युनतम दरधारक ठरला तरीही प्रत्येक तिमाही कालावधीचा पुरवठा आदेश, करारनामा स्वतंत्र करण्यात येईल. यामध्ये पहिल्या तिमाहीमध्ये पुरविलेले तूपाचा व दिलेल्या सेवेचा दर्जा विचारात घेऊन पुढील तिमाहीसाठी पुरवठा आदेश देणेबाबत विचार केला जाईल.

...३...

८. चारही टप्प्यांमध्ये स्वतंत्र न्युनतम दरधारक असल्यास चारही न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश व्हेंडर ऑडिटचा अहवाल सकारात्मक असलेस लगेच देणेत येतील. त्यानुसार संबंधित पुरवठाधारकांनी ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम श्री साईबाबा संस्थानकडे त्वरीत भरणे व श्री साईबाबा संस्थानला करारनामा करून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

## K. शुध्द तूपाचा स्वीकार करण्याची पध्दत-

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच तसेच आपण निविदेसोबत दिलेल्या ब्रॅण्डप्रमाणेच तूपाचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

२. शुध्द तूपाचा पुरवठा मान्य झालेले ब्रॅण्डचाच करावा लागेल. कमी दर्जाचे, वेगळ्या प्रकारचे अगर जातीचे किंवा खराब तूप स्विकारले जाणार नाही. अशा तूपाचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर श्री साईबाबा संस्थानने मान्य केलेल्या ब्रॅण्डप्रमाणेच तूप पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल. तसेच शुध्द तूप हे FSSAI/AGMARK NORMS चे दर्जाप्रमाणे असणे आवश्यक राहील.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे श्री साईबाबा संस्थानकडे तूप पाठविल्यानंतर श्री साईबाबा संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून तूपाची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास ते स्विकारण्यात येईल. पुरवठाधारकांनी दिलेल्या ब्रॅण्डप्रमाणेच तूप पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या तूपाची Quantity जास्त असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानकडून Randomly Sample घेऊन ते स्विकारले जाते. तथापी तूप स्विकारलेनंतरही एखादा लॉट, डबा अगर काही खराब तूप आढळल्यास किंवा तुपामध्ये भेसळ अथवा ते कमी दर्जाचे किंवा नमुन्यादाखल दिलेल्या दर्जाचे व ब्रॅण्डचे नाही असे आढळल्यास तो संपुर्ण लॉट स्व:खर्चाने बदलून दयावा लागेल. शिवाय या कारणास्तव पुरवठाधारकाशी केलेला मूळ करारच रद्द करण्याचे अधिकार संस्थान प्रशासन राखून ठेवत आहे.

६. शुध्द तूप पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार तूपाच्या डब्यावर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

७. शुध्द तूपाचे डब्यावरचे लेबल अन्न सुरक्षा नियम २०११ व वैध मापन शास्त्रच्या तरतुदीप्रमाणे असणे बंधनकारक राहील.

यामध्ये खालील बाबींचा उल्लेख असावा.

१. उत्पादकाचा FSSAI Lic No.
२. Brand & Quantity
३. Lot No/ Batch No & Date of Manufacturing
४. कायदयाप्रमाणे गुणवत्ता व मानके याविषयी हमी (Warranty)
५. Best Before Date or Expiry Date

८. शुध्द तूपाचा पुरवठा नवीन पत्र्याचे डब्याचे पॅकिंग १५ किलो वजनाचे पॅकबंद डब्यामध्येच करावा लागेल. डब्यावर मंजूर ब्रॅण्डचे नांव, फर्मचा ॲगमार्क/FSSAI Lic No. तसेच तूपाचे Manufacturing & Expiry Date इ.तपशिल असणे आवश्यक आहे. Expiry Date जवळ आलेले तूप स्विकारले जाणार नाही. शुध्द तूप स्विकारतांना डब्याचे वजन वजा करण्यात येईल तसेच ग्रॅममधील वजन बिलासाठी ग्राहय धरले जाणार नाही. तूपाचे डब्याचे झाकण बॅरीकॅप पध्दतीचे असावे.

९. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या तूपामध्ये भेसळ अथवा ते कमी दर्जाचे किंवा नमुन्यादाखल दिलेल्या दर्जाचे व ब्रॅण्डचे नाही असे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत पुरवठाधारकाची राहील. अशा पुरवठा केलेल्या तूपाची रक्कम आदा करण्याचे बंधन श्री साईबाबा संस्थानवर असणार नाही.

१०. तूपाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade Quality चे असावे.

११. गाईचे शुध्द तूप पुरवठा करतेवेळी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/NABL मान्यताप्राप्त Lab चा पुरविलेले बॅचचा अहवाल बीलासोबत सादर करावा लागेल.

**L. शुध्द तुपाची लॅब तपासणी करण्याची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या तूपाची गरजेनुसार श्री साईबाबा संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या तूपाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर तूप बदलून द्यावे लागेल. त्या दरम्यान श्री साईबाबा संस्थानला बाहेरुन शुध्द तूप विकत घ्यावे लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या तूपाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही तूपाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेले तूप वापरले गेले व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील तूपाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. पुरविलेल्या शुध्द तूपाचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर निविदाधारकांवर संस्थान प्रशासनाकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत तक्रारदाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. श्री साईबाबा संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पूर्ण खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजण्यात येईल.

**M बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या तूपाचे बिल तूपाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावर ३० दिवसांचे आत आदा करणेचा श्री साईबाबा संस्थानचा प्रयत्न राहिल.

२. पुरवठाधारकाने पुरविलेले तूप संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून तूप खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर तूपाच्या बिलातुन वसुल केली जाईल..

३. तूपाचा पुरवठा करतांना बिलांवर खालील बाबी नमुद करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १) पुरवठादाराचा GST क्रमांक | २) तूपाचा Brand & Quantity |
| ३) संस्थानचा GST क्रमांक | ४) Lot No./Batch No |

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील शुध्द तूप मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा आदेश दिलेल्या दराने पुरवठा न केलेल्या तूपाची एकुण किंमत रू.२ लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा आदेश दिलेल्या दराने पुरवठा न केलेल्या तूपाची एकुण किंमत रू.२ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. शुध्द तूप पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत शुध्द तूपाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने गरजेइतके किंवा दिलेल्या आदेशा इतके शुध्द तूप दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या शुध्द तूपासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या तूपाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

...५...

३. पुरवठा आदेशातील मंजुर दराने व मान्य केलेल्या ब्रॅण्डप्रमाणे शुध्द तूपाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने शुध्द तूप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा तूपाचा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन तूप खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच संस्थान प्रशासनामार्फत उचित कारवाई करण्यात येईल.

४. कुठल्याही अपरिहार्य कारणास्तव मंदिर बंद राहिल्यामुळे प्रसाद सेवा बंद करावी लागल्यास व त्या दरम्यान श्री साईबाबा संस्थानकडे शुध्द तूप शिल्लक असल्यास व ते श्री साईबाबा संस्थानला परत करावयाचे असल्यास ते पुरवठाधारकास परत घ्यावे लागेल किंवा बदलून दयावे लागेल.

५. पुरवठाधारकाने कुठल्याही कारणाने शुध्द तूपाचा पुरवठा केला नाही तसेच श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तीचा भंग केल्यास त्यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करण्यात येऊन पुरवठाधारकाला पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत टाकले जाईल संस्थान प्रशासन याबाबतीत जो निर्णय घेईल तो संबंधित पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

६. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक शुध्द तूपाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे.

**O निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १८० दिवसांचा राहील.

**P. सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे प्लॅन्टचे संस्थानकडून अगर संस्थान नियुक्त Agency/Team कडून गरजेनुसार Vendor Audit केले जाईल. Vendor Audit साठी येणा-या पथकातील सदस्यांना प्लॅन्टबद्दल आवश्यक असणारी सर्व अनुषंगिक असलेली माहिती उपलब्ध करून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

३. सदरील व्यवहाराबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात शुध्द तूप पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या शुध्द तूपाच्या ५० टक्के परिमाणाचा शुध्द तूपाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर न्युनतम दरधारकाच्या दरात शुध्द तूप पुरविणेस तयार नसतील तर पुर्ण शुध्द तूपाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक असणार नाही.

६. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

...६...

७. पुरवठा केलेल्या गाईचे शुध्द तुपापासून बुंदी तळतांना धूर झाल्यास अगर बुंदीची कडवट चव आल्यास, बुंदी तळतांना फेस आल्यास किंवा काही खराब तुप आढळल्यास सदर तूप स्वखर्चाने त्वरीत बदलून देण्याची जबाबदारी पुरवठाधारकावर राहील. त्याबाबत कोणतीही लेखी/तोंडी तक्रार करता येणार नाही.

८. सदरचे शुध्द तूप हे श्रींच्या बुंदी व लाडू प्रसादासाठी वापरले जात असल्यामुळे पुरवठाधारकाने पुरविल्या जाणा-या शुध्द तूपाची गुणवत्ता व दर्जाचे बाबतीत विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

९. निविदाधारकाने/पुरवठाधारकाने ई-निविदा प्रक्रिया अगर पुरवठा कालावधी दरम्यान False Declaration/ Certification/ Corrupt Activities केल्याचे आढळून आल्यास निविदाधारकाचा/पुरवठाधारकाचा काळया यादीत समावेश केला जाईल.

१०. शुध्द तूपाची डिलेव्हरी स्विकारतांना डबे फुट-तूट झालेमुळे कमी प्राप्त झालेले शुध्द तूपाची बील रक्कम प्राप्त परिमाणानुसार पुरवठाधारकाचे बीलातून कमी केली जाईल.

११. श्री साईबाबा संस्थानला पुरविलेले जाणारे शुध्द तूप हे गाईचे दूधापासून तयार झालेले क्रिम/बटर पासून तयार केलेले असावे. तसेच सदर तूप हे पुरवठाधारकाने स्वत: पुरवावयाचे आहे. पुरवठयाचे Sub-contract मान्य केले जाणार नाही.

१२. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | ------------------------------------------------ |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे | १. ------------------------------------------------ |
| | | २. ------------------------------------------------ |
| ६. | बॅंक खाते नांव | १.------------------------------------------------ |
| | शाखा | २. ------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------ |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------ |

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत उत्पादक संस्थेचा दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका, महानगरपालिका)

२. GST नोंदणी क्रमांकासाठीची Online Registration Acknowledgement/दाखला

३. पॅन कार्ड

४. सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षांची किमान सरासरी उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र (सोबतचे नमुन्याप्रमाणे)

५. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी (FSSAI) परवाना/AGMARK परवाना

६. काळ्या यादीत समाविष्ट केले नसलेबाबतचे प्रमाणपत्र

७. प्रतीदिन २५ क्विंटल किंवा त्यापेक्षा जास्त उत्पादन क्षमता असल्याचे FSSAI/AGMARK/ /सक्षम शासकीय प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

**ब) शुध्द तूपाचा डबा, ब्रॅण्ड, फर्मचे नांव इ. तपशिलासह स्वाक्षरी करुन सिलबंद असलेले**

दिनांक - / /२०२२
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२२-२३ करिता लाडू निर्मिती, प्रसादालय व मंदिर विभागांसाठी गाईचे शुध्द तूप पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या तूपाचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता श्री साईबाबा संस्थानचे आवश्यकतेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर तूपाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त तूपाची श्री साईबाबा संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही ती मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या ब्रॅण्डची निविदा मंजुर होईल, त्या मान्य दराने तूपाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर तूप पुरवठा आदेश एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत ब्रॅण्डप्रमाणे तूप वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२२

ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या ३ वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१८-१९ | |
| २ | सन २०१९-२० | |
| ३ | सन २०२०-२१ | |
| | एकुण | |
| | ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :-
ठिकाण :-

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.

*FIRM LETTER HEAD*

*************************************************************

***UNDERTAKING***

-----------------------------------------------------------------------------

*This is to certify that we M/s. ....................................... are not blacklisted from any Government/ Semi Government Institutions/ Trust/ Corporation for the supply of Pure Cow Ghee in last five years.*

*Sign. & Stamp Of Tenderer*

*Place :*

*Date :*

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

BOQ

Requirement of Cow Ghee Pure for the Period of May-2022 to July-2022

| Sr.No | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2,125 | Quintal | | |

(Bhagyashree Banayat, I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

BOQ

Requirement of Cow Ghee Pure for the Period of August-2022 to October-2022

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2,125 | Quintal | | |

(Bhagyashree Banayat, I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

BOQ

Requirement of Cow Ghee Pure for the Period of November-2022 to January-2023

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2,125 | Quintal | | |

(Bhagyashree Banayat, I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

BOQ

Requirement of Cow Ghee Pure for the Period of February-2023 to April-2023

| Sr.No | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, AGMARK/FSSAI | 2,125 | Quintal | | |

(Bhagyashree Banayat, I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi